आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२१ नोव्हेंबर २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना आज गयानाकडून ‘द ऑर्डर ऑफ एक्सलन्स’ हा सर्वोच्च सन्मान प्रदान

- राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी ६५ टक्क्यांहून अधिक मतदान, १९९५ नंतर पहिल्यांदा एवढ्या मोठ्या प्रमाणात मतदारांचा उत्साह

- सीबीएसईच्या १० वी आणि १२ वीच्या परीक्षा १५ फेब्रुवारीपासून

**आणि**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून देशाचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक म्हणून के. संजय मूर्ती यांना शपथ

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी यांना आज गयाना देशातला सर्वोच्च सन्मान ‘द ऑर्डर ऑफ एक्सलन्स’ प्रदान करण्यात आला. मोदी यांचं दूरदृष्टी असलेलं नेतृत्व, जागतिक पातळीवर विकसनशील देशांच्या हक्कांना त्यांनी मिळवून दिलेलं व्यासपीठ, आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या समुदायासाठी त्यांचं उल्लेखनीय कार्य आणि भारत-गयाना देशांमधले संबंध अधिक दृढ करण्यासाठीची त्यांची कटिबद्धता आदीं साठी मोदी यांना या सर्वोच्च पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. गयानाच्या स्टेट हाऊस मध्ये आज एका समारंभात गयानाचे अध्यक्ष डॉ. मोहम्मद इरफान अली यांच्या हस्ते मोदी यांना या पुरस्कारानं गौरवण्यात आलं. हा सन्मान दोन्ही देशातल्या नागरिकांमध्ये रुजलेल्या ऐतिहासिक संबंधांना समर्पित करत असल्याचं

मोदी यावेळी म्हणाले. हा दौरा म्हणजे परस्पर देशातली मैत्री अधिक दृढ करण्याचा भारताच्या कटिबध्दतेचा पुरावा असल्याचं ते म्हणाले. भारत-गयाना मधले संबंध सामायिक इतिहास, सांस्कृतिक वारसा आणि उभय देशांचा परस्परांवरचा विश्वास यावर आधारित असल्याचं मोदी यांनी सांगितलं. भारत प्रत्येक क्षेत्रात गयाना ला बरोबरीनं साथ देण्यासाठी उत्सुक असून दोन्ही देशातले संबंध संपूर्ण सर्व विकसनशील देशांसाठी महत्वाचे असल्याचं मोदी यांनी यावेळी बोलताना अधोरेखित केलं.

**<><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाकडून आतापर्यंत मिळालेल्या आकडेवारीनुसार राज्यात ६५ टक्क्यांहून अधिक मतदान झालं. निवडणूक आयोगाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार आज रात्रीपर्यंत मतदानाची अंतिम टक्केवारी हाती येईल. त्यानुसार या टक्केवारी आणखी १-२ टक्क्यांची वाढ होण्याची शक्यता आहे. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीनंतर पहिल्यांदा राज्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात मतदान झालंय. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत ७१ पूर्णांक ६९ टक्के मतदारांनी मताधिकार बजावला होता.

राज्यात सर्वाधिक सव्वा ७६ टक्के मतदानाची नोंद कोल्हापूर जिल्ह्यात झाली. अहिल्यानगर, बुलडाणा, चंद्रपूर, गडचिरोली, हिंगोली, जालना, परभणी, सांगली, सातारा या जिल्ह्यांमध्येही ७० टक्क्यांपेक्षाही जास्त मतदानाची नोंद झाली. सर्वात कमी ५२ टक्के मतदान मुंबई शहर या जिल्ह्यात नोंदवलं गेलं. मुंबई उपनगर जिल्ह्यात ५५ पूर्णांक ७७ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली. ठाण्यात ५६ टक्के मतदान झालं. हे ३ जिल्हे वगळता इतरत्र ६० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झालं. मतदारसंघाचा विचार करता चिमूर आणि कागलमध्ये ८१

टक्क्यांपेक्षा जास्त मतदारांनी मतदान केलं. राज्यातल्या २७ पेक्षा जास्त मतदारसंघात ७५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदानाची नोंद झाली. सर्वात कमी ४४ पूर्णांक ४९ टक्के मतदान कुलाबा मतदारसंघात झालं. अंबरनाथ, मुंबादेवी, धारावी आणि भिवंडी पूर्वमध्ये ५० टक्क्यांपेक्षाही कमी मतदान झालंय.

**<><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात काल ६८ टक्क्यांहून अधिक मतदान झालं. नाला मतदारसंघात ८० टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद झाली. सर्व मतदान यंत्र स्ट्राँग रुम मध्ये ठेवली असून तिथे सीसीटीव्हीसह त्रिस्तरीय सुरक्षा यंत्रणा लावली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी के. रवी कुमार यांनी दिली.

**<><><><>**

सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण संस्थेनं  बिटकॉईन घोटाळ्यांतर्गत अमित भारद्वाज, अजय भारद्वाज आणि इतरांविरुद्ध तक्रार नोंदवली आहे. या तक्रारीनुसार, आरोपींनी ८० हजार बिटकॉईनच्या माध्यमातून ६ हजार ६०६ कोटी रुपयांचा निधी नऊ परदेशी कंपन्यांद्वारे परदेशात मालमत्ता खरेदी करण्यासाठी वळवला. या प्रकरणी गौरव मेहता यालाही काल समन्स बजावण्यात आलं आहे. राज्य विधानसभा निवडणुकीच्या आदल्या दिवशी निवृत्त पोलीस अधिकारी रविंद्रनाथ पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे आणि महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांच्यावर क्रिप्टोचलन फसवणूक प्रकरणात गुंतल्याचा आरोप केल्यानंतर हे प्रकरण चर्चेत आलं.

**<><><><>**

दिल्ली आणि एनसीआर परिसरातल्या हवेची गुणवत्ता अतिगंभीर श्रेणीत अद्यापही कायम आहे. आज दुपारी १ वाजेपर्यंत सरासरी वायु गुणवत्ता निर्देशांक ३७४ इतका नोंदवला गेला. तर शहरातल्या काही भागांनी ४००च्या पातळीचं उल्लंघन केल्याचं आढळलं आहे. यात वजीरपूर, जहांगीरपुरी, अशोक विहार, पंजाबी बाग, आनंद विहार अशा भागांचा समावेश आहे.

**<><><><>**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या बोर्डाची परीक्षा १५ फेब्रुवारी पासून सुरु होणार असल्याची घोषणा आज सीबीएसईनं केली. दहावी बोर्डाच्या परीक्षा १८ मार्चला तर बारावीच्या परीक्षा ४ एप्रिल रोजी संपतील.

सीबीएसई नं यावर्षी पहिल्यांदाच परीक्षेच्या ८६ दिवस आधीच वेळापत्रक जाहीर केलं असून प्रत्येक विषयाच्या परीक्षेमध्ये पुरेसा अवधी राखण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय बारावीच्या परीक्षांचं वेळापत्रक विविध प्रवेश परीक्षांच्या तारखा लक्षात घेऊन ठरवण्यात आल्या आहेत. एका दिवशी कोणत्याही दोन विषयांची परीक्षा येऊ नये याची काळजी घेऊन ४०हजार विषयांच्या पर्यायांची पडताळणी करून बोर्डानं हे वेळापत्रक तयार केलं आहे.

**<><><><>**

के. संजय मूर्ती यांनी आज सकाळी नवी दिल्ली इथं देशाचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना आज, राष्ट्रपती भवन इथं पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. ऑगस्ट २०२० मध्ये CAG म्हणून नियुक्त झालेल्या गिरीश चंद्र मुर्मू यांच्या जागेवर मूर्ती यांची नियुक्ती

झाली आहे. याआधी मूर्ती यांनी शिक्षण मंत्रालयात उच्च शिक्षण विभागाचे सचिव म्हणून काम केलं आहे.

<><><>

आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या संघर्षांवर तोडगा काढण्यासाठी भारत नेहमीच सकारात्मक आहे, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितलं. लाओसमध्ये व्हिएन्तियान इथं अकराव्या आसियान संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीत ते आज बोलत होते. सीमा वाद ते व्यापार करार, यात घेतलेल्या भूमिकांमधून भारताची खुला संवादाबाबतची वचनबद्धता दिसून येते असं ते म्हणाले.

<><><>

अमेरिकेतले भारताचे राजदूत विनय मोहन क्वात्रा यांनी नुकतीच जॉर्जियाचे सिनेटर जॉन ओसॉफ  यांची भेट घेतली. भारत- अमेरिका दरम्यान भागीदारी अधिक दृढ करण्यासाठी सिनेटनं दिलेल्या पाठिंब्याबद्दल क्वात्रा यांनी समाज माध्यमांद्वारे त्यांचे आभार मानले. दरम्यान, क्वात्रा यांनी न्यू हॅम्पशायर इथल्या  सिनेटर जीन शाहीन यांचीही भेट घेतली असून दोन्ही देशातल्या संबंधांवर त्यांनी जी सकारात्मकता दाखवली त्यासाठी त्यांचे आभार मानले आहेत.

<><><>

गाझा पट्टीत तात्काळ आणि बिनशर्त युद्धबंदीची मागणी करणाऱ्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या ठरावावर अमेरिकेनं  नकाराधिकार वापरला आहे. युद्धबंदीसह ओलीस असलेल्या सर्व नागरिकांची बिनशर्त सुटका करण्याची मागणीही या ठरावात करण्यात आली. मात्र, अमेरिकेनं  या नागरिकांच्या सुटकेच्या प्रश्नाचं निराकरण करण्यात अपयशी ठरल्याचं सांगत या ठरावाला विरोध केला.

<><><>

55 व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा अर्थात इफ्फीचा काल गोव्यात शानदार सोहळ्यानं प्रारंभ झाला. या सोहोळ्यात हिंदी चित्रपट सृष्टीतल्या कलाकारांनी ‘नाइनटीज रिवाइंड, टाइमलेस सोल्स’ ही संकल्पना राबवत विविध कार्यक्रम सादर केले. टाइमलेस सोल्स या कार्यक्रमातून राज कपूर, मोहम्मद रफी यांच्यासारख्या दिग्गजांना आदरांजली वाहण्यात आली. उद्घाटनाच्या कार्यक्रमात वेव्हज या प्रसार भारतीच्या ओटीटी मंचाचं उद्घाटन करण्यात आलं. या ओटीटी मंचाद्वारे विविध भाषांमधल्या वृत्त, मनोरंजन, चित्रपट वाहिन्या प्रेक्षकांना पाहता येतील.

इफ्फी महोत्सव म्हणजे भारताच्या चित्रपट उद्योगातला मैलाचा दगड असून यातून युवा कलाकारांच्या कलागुणांना वाव मिळेल, असं केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री आश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. तर इफ्फीच्या ‘क्रिएटिव्ह माइंड्स ऑफ टुमॉरो’ उपक्रमामुळे तरुणांना चित्रपट क्षेत्रातल्या दिगज्जांकडून सुयोग्य मार्गदर्शन मिळेल, असं राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी सांगितलं. आय आणि बी मंत्रालयानं सुरु केलेल्या सिंगल-विंडो सिस्टीमनं चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी मंजुरी मिळवणं सोपं केलं असून विविध अनुदानांच्या उपक्रमांमुळे चित्रपट निर्मात्यांसाठी व्यवसाय सुलभतेत भर पडली असल्याचं मुरुगन यांनी अधोरेखित केलं.

**<><><><>**

राष्ट्रीय प्रसारण सेवा अर्थात प्रसार भारतीनं आपलं ओटीटी व्यासपीठ वेव तयार केलं आहे. इफ्फीच्या उद्घाटन कार्यक्रमात त्याचं अनावरण झालं.

**//<><><><>//**